# विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, अमरावती

कॅम्प, अमरावती

दुरध्वनी- ०७२१-२६६२०३४/०७२१-२६६२९४७, फॅक्स-०७२१-२६६२७८२


---

**क्र.आकाअ/मशा.४/प्र.क्र.-८३८ /२०१९** **दि. १६ एप्रिल, २०१९**

**वाचा :** १) शासन महसूल व वन विभाग परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०२०००/प्र.क्र.१२७/ ई-९, दिनांक ०९ ऑक्टोंबर, २०००.

२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८२/२०१२, दि.२१.१०.२०११.

## परिपत्रक

अव्वल कारकून व मंडळ अधिकारी हे दोन्ही संवर्ग जिल्हा संवर्ग असून या दोन्ही संवर्गाचे नियुक्ती प्राधिकारी जिल्हाधिकारी आहेत. दि.०१.०१.२०१८ रोजीचे स्थितीवरील अव्वल कारकून / मंडळ अधिकारी संवर्गाची सेवाज्येष्ठता सूची जिल्हाधिकारी यांचे स्तरावर आक्षेपांचे निराकरण करुन अंतिम प्रसिध्द करण्यात आलेली आहे. जिल्हाधिकारी स्तरावर अंतीम करण्यात आलेल्या सेवाज्येष्ठता सूचीच्या आधारे दि.०१.०१.२०१६ ते ३१.१२.२०१७ या कालावधीतील दि.०१.०१.२०१८ रोजीच्या स्थितीवरील कार्यरत असलेल्या अव्वल कारकून व मंडळ अधिकारी संवर्गातील कर्मचाऱ्यांची विभागीय संयुक्त सेवाज्येष्ठता सूची म.ना.से.(ज्येष्ठतेचे विनियम) नियम,१९८२ आणि संदर्भ क्र.१ येथील परिपत्रकातील तरतुदींनूसार तयार करण्यात आलेली आहे.

विभाग स्तरावरील अव्वल कारकून व मंडळ अधिकारी संवर्गाची दि.०१.०१.२०१८ रोजीचे स्थितीवरील संयुक्त सेवाज्येष्ठता सूची या सोबत संलग्न केलेल्या परिशिष्टा प्रमाणे प्रसिध्द करण्यात येत आहे. संबंधीत जिल्हाधिकारी यांनी त्यांचे जिल्ह्यांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, तसेच सर्व तहसील कार्यालयांमध्ये सदर विभागीय संयुक्त सेवा ज्येष्ठता सूची प्रसिध्द करुन सर्व संबंधीत अव्वल कारकून व मंडळ अधिकारी यांचे निदर्शनास आणून द्यावी आणि त्याबाबतचा प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास ३ दिवसाच्या आत सादर करावा.

शासन महसूल व वन विभाग परिपत्रक क्र. एसआरव्ही - १०२०००/ प्र.क्र.१२७ / ई -९, दिनांक ०९ ऑक्टोंबर, २०००.मधिल निर्देशानूसार जिल्हाधिकारी यांचे स्तरावर प्रसिध्द करण्यात आलेल्या अंतीम सेवाज्येष्ठता सूचीच्या आधारे प्रसिध्द करण्यात येत असल्यामुळे पुन्हा त्यावर आक्षेप हरकती मागविण्याची आवश्यकता नाही, मात्र संयुक्त सेवाज्येष्ठता सूची प्रसिध्द करतांना काही वास्तव चुका आढळून आल्यास त्या या कार्यालयास जिल्हाधिकारी यांनी आपल्या अभिप्रायासह ३ दिवसाच्या आत अवगत कराव्यात.

२..

सदरहू विभागाच्या संयुक्त सेवाज्येष्ठता सूचिच्या अनुषंगाने निदर्शनास आलेल्या चुका जिल्हाधिकारी यांचेमार्फत ७ दिवसाच्या आत प्राप्त न झाल्यास तात्पुरती सेवाज्येष्ठता सूची बरोबर असल्याचे गृहीत धरुन सदरची सेवाज्येष्ठता सूची अंतिम करण्यात येईल.

(पीयूष सिंह)
**विभागीय आयुक्त,**
**अमरावती**

**प्रतिलिपी : माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.**

१) जिल्हाधिकारी, अमरावती / अकोला / यवतमाळ / बुलडाणा /वाशिम.
२) अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती.
३) उप आयुक्त (सामान्य प्रशासन /पुनर्वसन/रो.ह.यो.) विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती.
४) विशेष कार्य अधिकारी डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी,अमरावती
५) सहायक आयुक्त (भूसूधार/मा.व.क) विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती.
६) निवड नस्ती.